
# अशक्त नवजात बाळाची ओळख आणि देखभाल / काळजी

५ विषय N २

5

N-2







# लोकांना पहिल्यापासून माहिती असतं का, कोणते बाळ जिवंत राहू शकणार नाही ?

कार्ड दाखवा.
चर्चा सुरु करण्यासाठी सहभागींना खालील प्रश्न विचारा.

१. बाळाचा जन्म होताच कुटूंबातील लोकांना अंदाज येतो की, हे बाळ वाचणार / जगणार नाही ?

२. अशी कोणती लक्षणं आहेत, जे पाहून लोकांना समजत की बाळ वाचू शकत नाही ?

३. अशा परिस्थितीत कोण सल्ला देईल की, बाळाची प्रकृती चांगली नाही ? (ज्येष्ठ व्यक्ती, गावातील दायी इ.)

कोणत्याही प्रकारचे उत्तर तुम्ही स्वत: देऊ नका. काही वेळ चर्चा करुन पुढच्या कार्डवर जा.



## लोकांना पहिल्यापासून माहिती असतं का, कोणते बाळ जिवंत राहू शकणार नाही?



## हया विषयी लोकांचे काय मत आहे?

- ❖ असे कोणते कारण आहे ज्यामुळे बाळाचा मृत्यू होतो.
- ❖ हे कसे ओळखू शकतो की, एखादे जिवंत राहू शकणार नाही.



# डॉक्टर हे कसे ओळखतात की, कोणते बालक जिवीत राहण्याची शक्यता अधिक आहे.

**कार्ड दाखवा**

सहभागी बरोबर चर्चा करा.
दाखविण्यात येणारे आकडे आपल्याच राज्याच्या कोणत्या तरी जिल्हाचे आहेत.
सारणी लक्षपूर्वक वाचा

सारणीत दाखविलेल्या आकडयांपासून आपण काय समजू शकतो.
कोणतेही सक्रीय सहभागीला हे आकडे वाचण्यास व समजून घेण्यास सांगा आणि दुसऱ्या सहभागीला यांची उत्तरे देण्यास व चर्चा करण्यास संधी दया.

काही वेळेच्या चर्चेनंतर उजव्या बाजूला लिहिलेल्या मुद्दयांचा उपयोग समजून सांगण्यासाठी करा.

भारताच्या काही राज्यांमध्ये प्रति १००० जन्म घेतलेल्या बालकांपैकी साधारणत: ३० बालकांचा एक महिना पूर्ण करण्यापूर्वीच मृत्यू होत असतो. ही संख्या सारणीच्या शेवटच्या ओळीत दाखविण्यात आलेली आहे.

जेव्हा एखादे बालक आपल्या मातेच्या गर्भात सात आठ महिने पूर्ण करण्यापूर्वीच जन्माला येते तेव्हा आपण त्याला वेळेच्या पूर्वी अपरिपक्व प्रसूती असे म्हणतो. प्रति १००० प्रसूतीने जन्म घेतलेल्या बालकांमध्ये एकूण १०० बालकांचा वेळेच्या पूर्वी जन्म (अपरिपक्व) होतो. अशा बालकांचे वजन साधारणत: २ किलोपासून कमी असते. हे आकडेसुध्दा सारणीमध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

जसे की, आपण सारणीमध्ये आकडयांच्या रूपात पाहू शकतो की, १०० मधून मृत झालेल्या बालकांमध्ये २० बालके अशी आहेत ज्यांचा जन्म वेळेपूर्वी झालेला असावा अथवा ज्यांचे वजन दोन किलापेक्षा कमी आहे. परंतु एकूण अशी ९०० बालके आहेत ज्यांचा जन्म वेळेवर झालेला आहे तसेच जन्माच्या वेळी ज्यांचे वजन २ किलो अथवा अधिक आहे. त्यामध्ये मृत बालकांची संख्या फक्त १० विचारात घेण्यात आलेली आहे. हे आकडेसुध्दा सारणीमध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

प्रति १००० जन्म घेतलेल्या बालकांमधून मृत बालकांच्या संख्येची वाढ किंवा घट हया गोष्टींवर निर्भर राहते की, आपण आपल्या बाळाचे कोणत्याप्रकारे लक्ष ठेवत आहोत. काही राज्यांत ही संख्या फारच कमी आहे. याचा अर्थ असा आहे की, जर आपण आपल्या बालकांची देखभाल चांगल्याप्रकारे केली तर आपण बालमृत्यूवर नियंत्रण ठेवू शकतो.



# डॉक्टर कसे ओळखतात कोणत्या बाळाची जिवंत राहण्याची शक्यता अधिक आहे.



गर्भावस्थेत बाळाचे वय अथवा त्याचे वजन ह्याच्या आधारे हे पाहणे शक्य आहे की कोणते बाळ जिवंत राहण्याची शक्यता जास्त आहे.

| बाळ कितव्या महिन्यात जन्माला आले आहे. जन्माच्या वेळी त्याचे वजन काय होते. | एकूण जन्मलेल्या बालकांची संख्या | जन्मानंतर १ महिन्यांच्या आत मृत्यू झालेल्या बालकांची संख्या |
|---|---|---|
| साडेआठ महिन्यांच्या गर्भावस्थेनंतर जन्मलेले बाळ ज्याचे वजन २ किलोपेक्षा जास्त आहे. | ९०० | १० |
| साडेआठ महिन्यांच्या गर्भावस्थपूर्वी जन्मलेले बाळ ज्याचे वजन २ किलोपेक्षा कमी आहे. | १०० | २० |
| **एकूण** | **१०००** | **३०** |





# जन्माच्या वेळी कसे ओळखाल की, बाळ अशक्त आहे ?

**कार्ड दाखवा**

उजव्या बाजूस लिहिलेल्या उद्दिष्टांचा उपयोग करुन समजावून सांगा की जन्म होताच अशक्त बाळ कसे ओळखावे.

त्यांना समजवा की, आशा मॉड्यूल ७ च्या भाग सी च्या पान क्रमांक ४९ प्रमाणे त्यांना पूर्वीसुध्दा सांगण्यात आले आहे.

तसेच हीच गोष्ट आय.सी.डी.एस. च्या नवीन एम.आय.एस. रजिस्टर संख्या ८ आणि ९ मध्येसुध्दा दाखविण्यात आली आहे. तसेच गृहभेट नोंदीच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये देखील सांगण्यात आले आहे.

सहभागीद्वारा ह्या तीन्ही बिंदुना समजून घेतल्यानंतर विचारा.

अशक्त बाळ आणि आजारी बाळामध्ये काय फरक आहे. आठवून देण्याचा प्रयत्न करा की नवजात शिशुची देखभालबाबतच्या सत्रामध्ये आपण काय शिकलो होतो.

सहभागीने उत्तर दिल्यानंतर हे उत्तर दाखविणे.

जे बाळ जन्मत: गरजेनुसार स्तनपान करु शकत नसेल. त्याला अशक्त बाळ म्हणतात.

जे बाळ चांगल्याप्रकारे स्तनपान करत होते. पण सध्या ते स्तनपानामध्ये कमी रुची ठेवत असेल व तरतरीतपणा कमी दिसत असल्यास ते बाळ आजारी समजावे.

दोन्ही मध्ये फरक कळणे महत्त्वपूर्ण आहे. बाळाची देखभाल घरात करु शकता पण आजारी बाळाचा जीव वाचविण्यासाठी त्यास तात्काळ दवाखान्यात घेऊन जावे.

आता आपण जन्म होताच अशक्त बाळ कसे ओळखावे हे शिकणार. जर आपल्याला नवजात बालकांमध्ये खालीलपैकी कोणतेही लक्षण दिसले तर ते बाळ अशक्त समजावे.

१. गर्भावस्थेत साडे आठ महिने अथवा ३७ आठवडे पूर्ण करण्यापूर्वीच जर बाळाचा जन्म झालेला आहे. आपण हे कसे ओळखाल? (जर आपल्याला महिलेचा एल.एम.पी. माहित असेल तर आपण हे समजू शकतो की बाळाचा जन्म किती दिवसांपूर्वी झालेला आहे. लवकरच आम्ही एम.एम.पी. इ.डी.डी. सारणीचा उपयोग करुन हयाची गणना करायला शिकणार आहोत.

२. जन्माच्या वेळी बालकाचे वजन २ किलोपेक्षा कमी आहे. हे आपण कसे माहिती करुन घ्याल. (जर आपण जन्माच्यानंतर लवकरात लवकर बाळाचे वजन घेतले तर आपणांस हे कळू शकते.)

बाळाचा जन्म होताच आवश्यकतेनुसार तो स्तनपान करत नसेल तर आपल्याला हे कसे कळेल? आपण जन्मानंतर लवकरात लवकर बाळाला स्तनपान करीत असताना निरीक्षण केल्यावर कळेल. ह्याविषयी बाळाची देखभाल करण्याबाबत मागील चर्चेत आपणांस सांगितले आहे.

जर बाळामध्ये ह्या तिन्ही लक्षणांमधून एक जरी लक्षण दिसले तर त्याला अशक्त समजायला हवे. ह्या बालकांना अतिरिक्त देखभालीची आवश्यकता आहे.



# जन्म होताच कसे ओळखणार की बाळ अशक्त आहे.



खालीलपैकी कोणतेही एक लक्षण दिसल्यास बाळ अशक्त समजले जाईल.

१. साडे आठ महिने पूर्ण होण्यापूर्वी बाळाचा जन्म झाला असेल तर.





२. जन्मत: बाळाचे वजन २ किलोपेक्षा कमी असेल तर.



३. जन्मानंतर बाळ गरजेनुसार योग्य शक्ती लावून स्तनपान करु शकत नसेल.





# एल.एम.पी.नी परिपक्वता ची तारीख कशी काढणार?

कार्ड दाखवा

सहभागींना एल.एम.पी. - इ.डी.डी. - डि.ओ.एम. ची गणना करणारे पान उघडण्यास सांगा. विचारा की त्यांनी कधी ह्या शीटचा प्रयोग कोणीही गर्भवती महिलेच्या इ.डी.डी. (प्रसुतीची संभावित तिथी) काढण्यासाठी केलेला आहे का ? तसेच त्यांनी कधी ह्या शीटचा प्रयोग गर्भवती महिलेचा डि.ओ.एम. परिपक्वताची तिथी काढण्यासाठी केलेला आहे का ?
सहभागींना कोणत्याही गर्भवती महिलेचा खालील एल.एम.पी. ते इ.डी.डी. ते डि.ओ.एम. काढण्यास सांगणे (उदाहरणार्थ - एल.एम.पी., इ.डी.डी. आणि डि.ओ.एम. सारख्या पृष्ठापासून कोणत्याही महिलेचा एल.एम.पी. चा प्रयोग करा.)
नंतर उजव्या बाजूला दिलेल्या मुद्यांचा उपयोग करुन त्यांना इ.डी.डी. आणि डी.ओ.एम. काढण्याकरिता शीट च्या माध्यमातून गणना करावयास शिकवा.
सहभागींना अन्य २ महिलांची निम्न एल.एम.पी. पासून इ.डी.डी. आणि डी.ओ.एम. काढण्यास सांगणे. (उदाहरणार्थ - एल.एम.पी., इ.डी.डी. आणि डि.ओ.एम. सारख्या पानापासून कोणत्याही महिलेचा एल.एम.पी चा प्रयोग करा.)
सहभागींना समजविण्यास थोडासा वेळ द्या. बघा की कोणते सहभागी कमी वेळात बरोबर तारखेची गणना करु शकत आहे. ह्या सहभागींना अन्य लोकांनासुध्दा तारीख काढण्यास शिकविण्यास मदत करण्यास सांगणे.

**खालील मुद्दयांवर जोर देणे :**

★ गर्भावस्थेच्या साडेआठ महिने अथवा ३७ आठवडयांच्या पूर्वी जन्मलेल्या बालकांला वेळेपूर्वी जन्मलेला (अपरिपक्व) बाळ म्हणाल. ह्या बाळाला जीवीत ठेवण्यासाठी अतिरिक्त देखभालीची आवश्यकता असते. याकरिता जन्मानंतर ह्या प्रकारच्या बालकांना लवकरात लवकर ओळखणे आवश्यक असते.

★ जर कोणा महिलेला परिपक्वताच्या तारीखेपूर्वी ही प्रसूती कळ उद्भवत असेल तर ती अपरिपक्व बाळाला जन्म देण्याची शक्यता असून ह्या प्रकाराची प्रसूती रुग्णालयातच करायला हवी.

★ परिपक्वतेची तारीख फार महत्त्वपूर्ण असल्यामुळे हे समजल्यानंतर ह्या गृहभेट नोंदीतून प्रसूतीची अंदजित तारीख बरोबर लिहायला हवी. ह्याप्रकारे प्रसूतीकळ प्रारंभ झाल्यास हे ओळखू शकणार की प्रसूती कोठे अपरिपक्व तर नाही अथवा परिपक्वताची तारीख निर्धारित तारखेपासून पुढे तर वाढली नाही.

**रकाना ३ चा उपयोग**

★ रकाना क्र. ३ मध्ये पहिल्या ओळीमध्ये त्या तारखा लिहिण्यात आलेल्या आहेत, जे अंतिम मासिक पाळीच्या दिनांकासाठी आहे (एल.एम.पी.)

★ दुसऱ्या ओळीमध्ये त्या तारखा लिहिण्यात आलेल्या आहेत, जी प्रसूतीची संभाव्य तारीख असते. (इ.डी.डी.)

★ तिसऱ्या ओळीमध्ये त्या तारखा लिहिण्यात आलेल्या आहेत, जी प्रसूतीची तारीख असते (डी.ओ.एम.)

**उदाहरण** : सलमा च्या अंतिम मासिक पाळीची दिनांक १० जून आहे. अंतिम मासिक पाळीची तारीख लिहा. जून च्या लाईनमध्ये १० ला शोधणे. ह्या दुसऱ्या लाईनमध्ये १० च्या खाली १७ तारीख लिहिलेली आहे. यावरुन आपण समजू शकतो की, ओळ ८ मार्च पासून प्रारंभ होते आणि ६ एप्रिल मध्ये समाप्त होते. ज्याचा अर्थ १७ मार्च हीच प्रसूतीची संभाव्य तारीख आहे. तिसऱ्या ओळीमध्ये १० च्या खालची तारीख २४ आहे, यावरुन आपण समजू शकतो की, ओळ १५ फेब्रुवारी पासून प्रारंभ होते आणि १६ मार्चला समाप्त होते. ह्याचा अर्थ असा की २४ फेब्रुवारी हीच परिपक्वताची तारीख आहे.



# शेवटच्या मासिक पाळीनुसार गर्भपरिपक्वतेचा दिनांक कसे काढणार



## सारणी : प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) आणि वेळेच्या पूर्व जन्मगणना

### (परिपक्वता तारखेपासून पूर्व कोणती ही जन्म असामायिक आहे)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | जानेवारी |
| ऑक्टोबर | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | नोव्हेंबर |
| सप्टेंबर | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | ऑक्टोंबर |
| फेब्रुवारी | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | | | | फेब्रुवारी |
| नोव्हेंबर | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | १ | २ | ३ | ४ | ५ | | | | डिसेंबर |
| ऑक्टोबर | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ | १२ | १३ | १४ | | | | नोव्हेंबर |
| मार्च | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | मार्च |
| डिसेंबर | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | जानेवारी |
| नोव्हेंबर | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | डिसेंबर |
| एप्रिल | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | | एप्रिल |
| जानेवारी | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | | फेब्रुवारी |
| डिसेंबर | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | | जानेवारी |
| मे | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | मे |
| फेब्रुवारी | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | मार्च |
| जानेवारी | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | फेब्रुवारी |
| जून | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | | जून |
| मार्च | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | | एप्रिल |
| फेब्रुवारी | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | | मार्च |
| जुलै | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | जुलै |
| एप्रिल | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | मे |
| मे मार्च | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | एप्रिल |
| ऑगस्ट | अंतिम मासिक पाळीची तारीख (एल.एम.पी.) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ऑगस्ट |
| मे | प्रसूतीची संभाव्य तारीख (इ.डी.डी) | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | जून |
| एप्रिल | परिपक्वताची तारीख (बी.डी.एम.) | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | मे |





# अशक्त बाळाला जीवीत राखण्यासाठी कशाप्रकारे सहाय्यता कराल?

**कार्ड दाखवा**

सहभागी यांना विचारा की, याच्यातील मुद्दयामधून प्रत्येक मुद्दयाचा अर्थ काय आहे? उजव्या बाजूस लिहिलेल्या मुद्दयाचा उपयोग करुन अशक्त बाळाची देखरेख कशी करायची हे समजवा.

सांगा की आशा (मॉड्यूल) ७ चा भाग सी, पान नंबर ५० नुसार त्यांना पूर्वीसुध्दा हे दाखविणेत आलेले आहे.

सांगा की हीच गोष्ट आय.सी.डी.एस. च्या नव्या एन.आय.एस. ची मार्गदर्शिकाच्या पुस्तिकामध्ये सुध्दा पान क्रं. ९ मध्ये दाखविण्यात आलेला आहे. सोबत गृहभेट नोंदणी संदेशाची यादी दाखविण्यात आलेली आहे.

दाखवा की, जर त्यांच्या जवळ एस.एन.सी.यू अथवा ह्या प्रकारची कोणतीही दुसरी सुविधा उपलब्ध आहे, ज्याचा खर्च कुटुंब करु शकतो. अशा बाळास त्वरित दवाखान्यात भरती करावे. जर हे शक्य होत नसेल तर उजव्या बाजुला दिलेल्या मुद्दयांचे काटेकोरपणे पालन करुन बाळाची घरातच देखभाल करावी.

**सगळया नवजात बालकांना एक समान आधारभूत देखभालीची आवश्यकता असते.**

★ जन्म होताच १ तासाचे आत बाळाला स्तनपान करायला हवे आणि अन्य कोणत्याही प्रकारचे पातळ पदार्थ किंवा घरचे औषध देऊ नये.

★ उबदारपणा कायम ठेवण्यासाठी जन्माच्या वेळी बाळाला कोरड्या कपड्याने पुसणे व स्वच्छ आणि कोरड्या सुती कपड्यात गुंडाळून आईजवळ ठेवणे.

★ पाच स्वच्छता मुद्दयांचा उपयोग करणे विशेषत: खात्री करणे की नाळ नवीन ब्लेडने कापायला हवी व स्वच्छ दोऱ्याने बांधली पाहिजे आणि नाळेवर काहीही लावू नये.

★ ह्या प्रकारच्या देखभालीने बाळाला संसर्ग आणि आजारांपासून वाचवू शकाल.

★ वेळेच्यापूर्वी जन्म घेतलेल्या बाळांना अधिक देखभालीची आवश्यकता असते कारण त्यामध्ये संसर्ग होण्याची व आजारी पडण्याची शक्यता जास्त असते.

★ स्तनपानाव्यतिरिक्त काही देऊ नये आणि वारंवार स्तनपान करावे. अशक्त आणि लहान बाळांना प्रत्येक तासाला जागे करुन स्तनपान करणे आवश्यक आहे. कारण अशक्त असल्यामुळे ते एका वेळेला अधिक दूध पीऊ शकत नाही.

★ परिपक्व बाळाच्या तुलनेत अशक्त बाळाला अधिक उबदारपणाची आवश्यकता असते. ज्याला राखण्यास कांगारु देखभाल देणे सर्वात चांगला उपाय आहे. ह्याविषयी आपण विस्तारपूर्वक नंतर शिकणार आहोत. बाळाची खोली बऱ्यापैकी गरम ठेवावी की ज्यामध्ये वयस्कर माणसाला घाम आला पाहिजे. ह्या प्रकारची देखभालीची आवश्यकता थंडीच्या दिवसात रात्रीचे तापमान कमी झाल्यास अथवा पावसाळयात होतो. जन्माच्या १ आठवडयापर्यंत बाळाला आंघोळ घालू नये.

★ बाळाला स्पर्श करण्यापूर्वी, स्वच्छ करण्यापूर्वी अथवा कपडे बदलण्यापूर्वी नेहमी हात स्वच्छ धुणे. बाळाला नेहमी स्वच्छ व कोरडे ठेवणे आणि नाळ वर काहीही लावू नये. नाळ सुकून पडली तरी काही लावू नये.

**सारांश** : वेळेच्या पूर्वी जन्मलेल्या बाळास नेहमी जास्तीत जास्त स्तनपान, उबदारपणा आणि जास्तीत जास्त स्वच्छतेची आवश्यकता असते.



# अशक्त बाळास जिवीत राखण्यासाठी कशाप्रकारे मदत करणे.



## सतत स्तनपान



## कांगारु देखरेख



## स्वच्छता अति आवश्यक







# आपण कशी खात्री कराल की जन्माच्या वेळी अशक्त जन्मलेले कोणतेही बालक आपल्या पासून वंचित राहू नये.

**कार्ड दाखवा.**

कोणत्याही एका सहभागीला एक एक करुन प्रश्न वाचण्यास सांगा आणि दुसऱ्या सहभागी यांना ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यास सांगा.

चर्चा पुढे चालू राहण्याकरिता उजव्या बाजूस दिलेल्या बिंदुंचा उपयोग करा.

**आपण कसे निश्चित कराल की, आपल्या जवळ प्रत्येक गर्भवती महिलेची एल.एम.पी. आहे.**

- ★ गर्भावस्थेची नोंदणी लवकरात लवकर केली पाहिजे आणि महिलेपासून एल.एम.पी. ची माहिती ती तारीख विसरण्या अगोदरच घेणे आवश्यक आहे.
- ★ नंतर इ.डी.डी. आणि डि.ओ.एम. ची माहिती नर्स अथवा डॉक्टर यांच्या मदतीने घेऊ शकता. परंतु हे आवश्यक नाही की प्रत्येक वेळी ही माहिती मिळू शकेल.
- ★ डि.ओ.एम. ची माहिती मिळताच डि.ओ.एम. बरोबर इ.डी.डी. सुध्दा गृहभेटी रजिस्टरमध्ये नोंद करणे.

**२. हे कसे निश्चित कराल की जन्माच्या वेळी बाळाचे बरोबर वजन घेण्यात यावे.**

- ★ रुग्णालयामध्ये जन्माच्या वेळी वजन घेणे व ते लिहून घेण्याकरिता प्रयत्न केले पाहिजे. पालकांद्वारे खात्री केली पाहिजे की, त्यांच्या बाळाचे वजनसंबंधी नोंदींचा कागद त्यांना दिले जातील.
- ★ जन्माच्या तीन दिवसांपर्यंत बाळाचे वजन घरातसुध्दा घेऊ शकता. ह्या साठी बाळाचे वजन करणाऱ्या मशीनचा उपयोग केला पाहिजे.

**३. बाळाच्या जन्माच्या वेळी वजन उपलब्ध नसल्यास आणि एल.एम.पी. ची माहिती नसल्यास काय करायला पाहिजे.**

- ★ ह्यांचा उपलब्ध होणे अथवा न होण्याची स्थितीत जन्माच्या दिवशी अथवा रुग्णालयातून घरी परतण्याच्या दिवशी स्तनपानाचे निरीक्षण अवश्य करा.
- ★ ह्याला सुनिश्चित करण्यापूर्वी पहिल्या दिवशी गृहभेट करणे आवश्यक आहे.



# आम्ही हे कसे निश्चित करणार की जन्माच्या वेळी अशक्त जन्मलेला कोणताही बालक आपल्यापासून वंचित राहू नये.



★ आम्ही कशी खात्री करणार की आपल्या जवळ प्रत्येक गर्भवती महिलेचा एल.एम.पी. असेल ?

★ आम्ही हे कसे निश्चित करणार की, बाळाला जन्माच्यावेळी वजन घ्यावयाचे राहू नये ?

★ जर आपल्याजवळ बाळाचे वजन अथवा एल.एम.पी. नसेल तर आपल्याला काय करायला पाहिजे ?





# पुढच्या महिन्याचे कार्य उद्दिष्ट - १
# अशक्त बाळाला ओळखण्यासाठी जन्माच्या वेळी प्रत्येक बाळाचे निरीक्षण करणे.

**सहभागींना दाखवा.**

आता आपण दाखवणार की कशाप्रकारे आम्ही अशक्त बाळाची ओळख करु शकणार.

**कार्ड दाखवा.**

कोणत्याही सहभागीला कार्ड वाचण्यास सांगा .
उजव्या बाजूस लिहिलेल्या बिंदुंचा उपयोग करुन दाखवा की याचा काय अर्थ आहे.

**चर्चेच्या नंतर विचारा.**
आपल्या मते एका अंगणवाडी केंद्रामध्ये वर्षात किती अशक्त बालके मिळायला हवीत ?

सहभागींना उत्तर देण्यास प्रोत्साहन करा. बरोबर उत्तर अशाप्रकारे हवे.

प्रत्येकी १० बालकांपैकी १ बाळ अशक्त जन्माला येते. जर कोणत्याही एका अंगणवाडी केंद्रामध्ये वर्षात २० प्रसूती होत असतील तर प्रत्येक वर्षी त्या केंद्रामध्ये कमीत कमी २ अशक्त बालके मिळायलरा हवीत.

**शेवटी यावर भर द्या.**
आम्ही अशक्त बाळांना तेव्हाच ओळखू शकणार की जेव्हा आपण सगळया बालकांचे निरीक्षण करणार. यासाठी प्रत्येक बालकाच्या घरी जाऊन गृहभेट देणे आवश्यक आहे.

जेवढया लवकर आपण अशक्त बाळाला ओळखू शकणार. तेवढया लवकर आपण निश्चित करु शकाल की बाळाला पूरेशी देखभाल मिळावी. यासाठी प्रत्येक बाळाच्या जन्माच्या दिवशी निरीक्षण करणे अत्यावश्यक आहे. नंतर खुप उसीर होऊ शकतो.

आम्ही प्रत्येक बाळाच्या जन्माच्या दिवशी अथवा प्रसूतीनंतर रुग्णालयातून घरी परत येण्याच्या दिवशी त्याच्या घरी गृहभेट देऊ आणि खालील गोष्टींवर लक्ष देऊ.

१. बाळाचा जन्म रुग्णालयात झाल्यास कुटुंबाला रुग्णालयात सांगितले आहे की, त्यांच्या बाळाचा जन्म वेळेपूर्वी झालेला आहे अथवा बाळ लहान व अशक्त असल्याने त्यास अतिरिक्त देखभालीची आवश्यकता असते. जर त्यांचे उत्तर हो असेल तर कुटुंबाला विचारा की त्यांना काय सांगितले आहे आणि अतिरिक्त देखभाल संबंधी सांगितलेल्या माहितीचे ते अनुकरण करीत आहेत का ?

२. बाळाचा गर्भकाळ अथवा जन्माच्या वेळेचे वजन लिहिलेले डिस्चार्ज कार्ड किंवा रुग्णालयातून मिळालेला कोणताही दुसरा पेपर कुटुंबाजवळ उपलब्ध आहे का. असल्यास बाळ अशक्त आहे किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी आम्ही या माहितीचा उपयोग करु.

३. बाळाचा जन्म घरी झाला असेल अथवा रुग्णालयात जन्म झाल्यावर सुध्दा असा कोणता पेपर ज्यावर बाळाचा गर्भकाळ अथवा वजनाची माहिती लिहिलेली असते कुटुंबाजवळ जर उपलब्ध नसेल तर आम्ही स्वत: याबाबत चौकशी करु.

- ★ आम्ही उचित वजनाच्या मशीनचा उपयोग करुन बाळाचे वजन घेणार आणि लिहणार.
- ★ आम्ही आपल्या रजिस्टरमध्ये लिहिण्यात आलेल्या डी.ओ.एम. च्या आधारावर बाळाचा जन्म डी.ओ.एम. च्या पूर्वी तर झालेला नाही याबाबत चौकशी करु.

४. सगळया स्थितीत आम्ही प्रसूतीच्या पहिल्या दिवसांच्या आत कमीत कमी एक वेळ स्तनपानाचे अवलोकन अवश्य करणार. ह्याप्रकारे बाळ पूर्णरुपाने स्वस्थ आहे हे निश्चित करु.

बाळ अशक्त असल्याबाबत निश्चित झाल्यास ह्या तीन माहिती आमच्या गृहभेट नोंदीमध्ये लिहून घेणार.

- ★ जन्माच्या वेळचे वजन
- ★ जन्माच्या वेळी बाळाचे गर्भकाळ महिना अथवा आठवडा. बाळ योग्यप्रकारे स्तनपान करीत आहे अथवा तो जोर लावून स्तनपान करीत आहे अथवा तो अगदीच दूध पीऊ शकत नाही का ?



# पुढच्या महिन्याचे कार्य बिंदु - १
# अशक्त बाळाला ओळखण्यासाठी जन्माच्या वेळी प्रत्येक बाळाचे निरीक्षण करणे.




जन्माच्या दिवशी आपण गृहभेटीच्या माध्यमातून खालील गोष्टींचे निरीक्षण करणार.

१. बाळाचा जन्म परिपक्वताच्या अवधीपूर्वीच झालेला आहे काय?

२. बाळाचे वजन २ किलोग्रॅम अथवा त्यापेक्षा ही कमी आहे काय?

३. बाळ योग्य प्रकारे स्तनपान करीत आहे का?





# पुढच्या महिन्याचे कार्य उद्दिष्ट - २
# अशक्त बाळाला अतिरिक्त देखभाल मिळेल याची खात्री करा.

**सहभागींना सांगणे**

वेळेपूर्वी जन्मलेल्या अथवा फार कमी वजनाच्या बालकांची सर्वात चांगली देखभाल एन.एन.सी.यू अशा विशेष रुग्णालयांमध्ये होऊ शकते. तरी पण काही ठिकाणी याप्रकारची रुग्णालये नसतानासुध्दा आम्ही घरी योग्य देखभाल करुन बालकाचा जीव वाचवू शकू.

दुसरा कार्य बिंदु हा आहे की अशक्त बाळाला अतिरिक्त देखभाल मिळत आहे याची आम्ही खात्री करु.

**कार्ड दाखवा.**

कोणत्याही एका सहभागीला कार्ड वाचण्यास सांगणे.

उजव्या बाजूस लिहिलेल्या बिंदुंचा उपयोग करुन दाखवा की ह्याचा अर्थ काय आहे.

**चर्चेच्या नंतर विचारा.**

जर आपल्याला हे समजले की एखाद्या बाळाला स्तन चोखण्यात अथवा दूध गिळण्यास अडचण होत असेल तर आपण काय करणार ? आईद्वारा स्तनपानाचा प्रयत्न केल्यानंतर सुध्दा जर बाळ तोंड उघडत नसेल आणि स्तनपानसुध्दा करु शकत नसेल तर आपण काय करणार ?

सहभागींना उत्तर देण्यासाठी प्रोत्साहीत करा. नंतर बरोबर उत्तर सांगा.
असे बालक ज्याला प्रयत्न करुनही स्तन चोखणे अथवा दुध गिळणे जमत नाही, तर ह्या गोष्टीची अधिक संभावना आहे की, त्यांचा जन्म वेळेपुर्वी (अपरिपक्व) झालेला आहे. अशा बालकांची देखभाल घरी होऊ शकणार नाही, ह्या बालकांना एस.एन.सी.यू. सारख्या कोणत्याही रुग्णालयात प्रवेश घ्यायला हवा. जरी हे रुग्णालय लांब असले तरी दाखल करणे आवश्यक आहे.

कोणतेही बाळ अशक्त आहे हे ओळखल्यानंतर आम्ही खालील गोष्टींचे निरीक्षण करु.

**१. बाळाला पुरेसा उबदारपणा मिळत आहे का ?**
- ★ खोलीमध्ये पुरेसे उबदार वातावरण आहे काय ?
- ★ खोलीमध्ये मोकळी हवा आहे काय ?
- ★ बाळाला कांगारु देखभाल (के.एम.सी.) दिली जात आहे अथवा बाळाला योग्यप्रकारे स्वच्छ आणि कोरडया कपडयामध्ये गुंडाळलेले आहे आणि त्यास आईच्या जवळ ठेवण्यात आलेले आहे.
- ★ कुटुंबाकडून बाळाला आंघोळ घालण्यात आलेली आहे काय ?

**२. बाळाचा योग्य प्रमाणात स्तनपान केले जात आहे ?**
- ★ बाळाला प्रत्येक तासात वेगवेगळया स्थानात स्तनपान करणे तसेच रात्रीसुध्दा स्तनपान करणे याबाबत आईला माहिती आहे काय ?
- ★ बाळ कोणत्या स्थितीत अधिक आरामाने स्तनपान करु शकते याची आईला जाणीव आहे काय ?
- ★ घरामध्ये कुटुंबाद्वारे बाळाला दूध पाजण्याकरिता उपयोगात आणलेला कप अथवा बाटली खोलीमध्ये दिसत आहे का ? (जर अशाप्रकारची कोणती वस्तू दिसल्यास ती तिथून काढून टाका.)

३. स्वच्छता राखून ठेवण्यासाठी कुटुंबाद्वारे कोणते योग्य कार्य करण्यात येत आहेत.
- ★ बाळाला स्पर्श करण्यापूर्वी हात स्वच्छ धूवत आहेत काय ?
- ★ बऱ्याच लोकांद्वारा बाळाला स्पर्श करण्यासाठी ते विरोध करीत आहेत काय ?
- ★ नाळ स्वच्छ आणि कोरडी आहे काय ?

बाळाच्या देखभाल अथवा स्वच्छतेबाबत कुटुंबाद्वारा सावधगिरी बाळगण्यात काही चुक होत असेल तर आम्ही त्या कुटुंबाला बाळाच्या स्वच्छतेविषयी योग्य माहिती देऊ आणि त्याचबरोबर हे सर्व का आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन करु.



# पुढच्या महिन्याचे कार्य उद्दिष्ट - २
# खात्री करा की अशक्त बाळाला अतिरिक्त देखभाल मिळेल.



प्रत्येक अशक्त ओळखण्यात आलेल्या बाळासाठी खालील गोष्टींची खात्री करु.

१. अतिरिक्त उबदारपणा - कांगारु देखरेख आणि कमीत कमी ७ दिवसांपर्यंत नवजात बाळाला आंघोळ घालू नये.

२. अतिरिक्त स्तनपान - बाळाला बऱ्याचवेळा जागे करुन स्तनपान करायला हवे.

३. अतिरिक्त स्वच्छता - बाळाला स्पर्श करण्यापूर्वी हात स्वच्छ असावेत.

खात्री करा की संभव असल्यास अशक्त बाळाला उचित रुग्णालयात देखभाल मिळेल.





# पुढच्या महिन्याचे कार्य उद्दिष्ट - ३

## खात्री करा की अशक्त बाळाला कमीत कमी १ आठवडा अतिरिक्त देखभाल मिळेल.

**सहभागींना सांगणे.**

बाळाच्या विशेष देखभालीसाठी कुटुंबाला केवळ एक वेळ मार्गदर्शन करणे योग्य नाही. एका अशक्त जन्मलेल्या बाळाला योग्यप्रकारे स्तनपान करण्यासाठी मजबूत बनविण्यासाठी कमीत कमी एक आठवड्याचा वेळ लागतो. आवश्यकतेनुसार बाळाने स्वत: दूध पीणे ह्या गोष्टींचा संकेत आहे की, बाळ संभाव्य धोक्यांपासून दूर आहे.

ह्या दरम्यान अशा फार गोष्टी घडतात की, होऊ शकते की कुटुंबाला जर समजण्यात आलेले नाही अथवा विसरतील. ह्या दरम्यान असे सुध्दा होऊ शकते की, कुटुंबाने आपले धैर्य सोडले असेल अथवा भीतीने कोणती चूक करत असेल. हे सुध्दा होऊ शकते की ते अनावश्यक घरचे उपचार करण्याचे प्रारंभ करणे अथवा कोणत्याही अयोग्य तज्ञांद्वारे उपचार करुन घ्याल. ह्या स्थितीत आपल्याला सतत परिवाराची सहाय्यता व धाडस तोपर्यंत वाढविणे जोपर्यंत शिशुच्या स्तनपानामध्ये सुधार होत नाही आणि बाळ झोपेतून उठून स्तनपान करत नसेल आणि स्वस्थ होत नाही.

तिसऱ्या कार्यबिंदुमध्ये खात्री करावयाची आहे की आपण सतत कुटुंबाची सहाय्यता तोपर्यंत करु शकाल जोपर्यंत बालक आवश्यकतेनुसार स्वत: जोर लावून स्तनपान करायला प्रारंभ करणार नाही.

**कार्ड दाखवा.**

कोणत्याही एका सहभागीला कार्ड वाचण्यास सांगा .
उजव्या बाजूस दिलेल्या बिंदुंचा उपयोग करुन त्याचा अर्थ समजवून सांगा.

**चर्चा संपल्यानंतर सांगा**
पुढील सत्रामध्ये आपण कांगारु देखभाल (के.एम.सी) च्या योग्य पद्धती समजून घेऊ.

जर बाळाच्या जन्माच्या पहिल्या दिवसापासूनच आम्ही हे ओळखण्यासाठी सक्षम झालो की, बाळ अशक्त आहे. बाळाची योग्य आणि विशेष देखभाल करणेसाठी प्रारंभ करण्यात आलेला असेल तर आम्ही खालील गोष्टींची खात्री करु.

१. जोपर्यंत बाळ गरजेनुसार स्वत: जोर लावून स्तनपान करायला प्रारंभ करीत नाही तोपर्यंत प्रती दिवस गृहभेट करीत राहा.

- ★ ह्यामध्ये सर्वसाधारण एक आठवडा लागतो पण कधी कधी यापेक्षा अधिक वेळ सुद्धा लागू शकतो.

२. **प्रत्येक गृहभेटीच्या वेळ खात्री करा की बाळाची योग्य देखभाल केली जात आहे.**

- ★ पुरेसा उबदारपणा आणि एका आठवड्यापर्यंत बाळाला आंघोळ न घालणे.
- ★ योग्य प्रमाणात केवळ स्तनपान, बाटलीचा प्रयोग करु नये.
- ★ योग्य साफ सफाई, स्वच्छता, हात धुवणे आणि बाळाच्या नाळची देखभाल करणे.

याचा उद्देश असा की आपल्याला काही दिवस बाळाच्या घरी एकाच दिवसात बऱ्याच वेळा गृहभेट करण्यासाठी जावे लागणार आहे.

जर गृहभेटीच्या वेळी आपल्याला माहित झाले की, बाळाची स्तनपान करण्याची रुची कमी होत आहे अथवा एक तासापर्यंत बाळाला जागविण्यात कठिण होत असेल तर बाळाला एस.एन.सी.यू सारख्या उचित रुग्णालयामध्ये घेऊन जाण्याचा कुटुंबाला सल्ला देऊ.



# पुढच्या महिन्याचे कार्य उद्दिष्ट - ३



**खात्री करा की अशक्त बाळाला कमीत कमी १ आठवडा अतिरिक्त देखभाल मिळेल.**

१. जोपर्यंत बाळ गरजेनुसार जोर लावून स्तनपान करु शकत नसेल, तोपर्यंत जेवढे शक्य होईल तेवढा अधिक वेळ आपण गृहभेट करणार.

२. बाळाला सतत अतिरिक्त देखभाल करण्यात येत आहे याची आम्ही खात्री करु.



